**विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या विभागातील शासन मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा/ निवासीशाळा/ उसतोड कामगारांच्या मुलांकरीता असलेल्या आश्रमशाळा / विद्यानिकेतन या आश्रमशाळांचे संस्थाचालक / शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी व इतर यांचेव्दारे शासन/ सचिव /संचालक/ प्रादेशिक उपायुक्त / सहाय्यक आयुक्त यांचे विरुध्द कोणतीही याचिका तसेच न्यायालयामध्ये अवमान याचिका दाखल करण्यापूर्वी तसेच मा. न्यायालयाच्या निकालाप्रमाणे दाद मागण्यासाठी पध्दत ठरविणे व मा.न्यायालयीन अवमानाचे प्रसंग टाळण्यासाठी कार्यपध्दती निर्धारीत करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग**
**शासन निर्णय, क्र.विभशा-२०१८/प्र.क्र.९१/विजाभज-२**
पहिला मजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १६ एप्रिल, २०१८

**वाचा: १. शासन निर्णय, क्र.विभशा-२०१७/प्र.क्र.२६६/विजाभज-२ दिनांक: - ०३ ऑक्टोंबर २०१७**
**२. शासन शुध्दीपत्रक क्र. विभशा-२०१७/प्र.क्र.२६६/ विजाभज-२ दिनांक :- २१ मार्च, २०१८.**

**प्रस्तावना :-**

शासनाचे असे निदर्शनास आले आहे की काही प्रकरणांत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या विभागातील शासन मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा/ निवासीशाळा/ उसतोड कामगारांच्या मुलांकरीता असलेल्या आश्रमशाळा / विद्यानिकेतन या आश्रमशाळांचे संस्थाचालक / शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी व इतर हे आपल्या तक्रारींच्या निवारणाकरीता थेट मा. न्यायालयात जातात. तसेच काही प्रकरणांत मा. न्यायालयाव्दारे संस्थाचालक/शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी व इतर यांचे बाजूने निकाल दिले जातात. परंतु, अशा रिट याचिका / अवमान याचिकांची प्रत / निकालांची प्रत शासनाला किंवा अमंजबजावणी अधिकारी यांना वेळेत मिळत नाही किंवा कल्पना सुध्दा दिली जात नाही किंवा काही वेळा मुद्दाम न्यायालयाचे निकाल निदर्शनास न आणता सरळ अवमानना प्रकरण न्यायालयात दाखल केली जातात आणि नाहक शासनाची बदनामी होते आणि शासनाला अडचणीत आणण्याचे प्रयत्न केले जातात, असे सर्व प्रसंग टाळण्यासाठी कार्यपध्दती निर्धारीत करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

१) राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या विभागातील शासन मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा/ निवासीशाळा/ उसतोड कामगारांच्या मुलांकरीता असलेल्या आश्रमशाळा / विद्यानिकेतन या आश्रमशाळांतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी अथवा संस्थेतर्फे मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांमध्ये मा. न्यायालयाने जे आदेश दिलेले असतात किंवा मा. न्यायालयाने दिलेला निकाल सर्व प्रतिवादींना (Respondents) कळविणे आवश्यक असते. तसेच, मा. न्यायालयाने दिलेला निकाल हा संबंधित कर्मचाऱ्याने अथवा संस्थेने संबंधित प्रतिवादींच्या कार्यालयास / विभागास कळविणे क्रमप्राप्त असते किंवा मा. न्यायालयाच्या निकालाची / आदेशाची प्रत संबंधित प्रतिवादींना विहित मुदतीत कार्यवाहीसाठी वादी (petitioner) यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मा. न्यायालयाचे आदेश / निकालाच्या अनुषंगाने प्रतिवादींनी विहित मुदतीत कार्यवाही केली नाही तर वादींनी मा. न्यायालयात दाद मागणे अथवा अवमान याचिका दाखल करणे उचित ठरते. परंतु, वादी तर्फे अशा प्रकारची कोणतीही कृती केली जात नाही. तथापि, मा.न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या /आदेशाच्या अनुषंगाने प्रतीवादी यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्याच्या कारणास्तव वादीतर्फे मा. न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यात येते. मात्र, ही बाब संयुक्तीक नसल्याने मा. न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यापूर्वी मा.न्यायालयाच्या निकालाप्रमाणे दाद मागण्यासाठी व मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अवमानाचे प्रसंग टाळण्यासाठी किंवा त्याबाबत दक्षता घेण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे. :-

I) मा. न्यायालयाच्या निकालाची / आदेशाची प्रत संबंधित संस्थाचालक आणि शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी व इतर वादी यांच्यातर्फे मा.न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या दिवसांपासून ०७ दिवसात शासनाचे सचिव / संचालक / प्रादेशिक उपायुक्त/ सहाय्यक आयुक्त किंवा संबंधित प्रतीवादी यांच्याकडे आपले लेखी निवेदनासह देणे आवश्यक राहिल. जे संस्थाचालक / शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी अथवा वादी मा.न्यायालयाचे निकाल संबंधित अधिकारी / शासन किंवा प्रतीवादी यांचे निदर्शनास न आणता सरळ न्यायालयात अवमान याचिका दाखल करुन शासनास अथवा

संबंधित अधिकारी यांना अडचणीत आणण्याचे प्रयत्न करतात, अशा संस्थेच्या विरुध्द तसेच शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची किंवा इतर योग्य कार्यवाही करावी.

II) याचिकाकर्ता यांनी मा. न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने संबंधित याचिकाकर्ता यांचे लेखी निवेदन व न्यायालयाच्या निर्णयाची प्रत प्राप्त झाल्यानंतर लगेच त्या निकालाची तात्काळ दखल घेवून संबंधित सहाय्यक आयुक्त / प्रादेशिक उपायुक्त यांनी लगेच योग्य ती कार्यवाही करावी. जर न्यायालयाचे आदेश धोरणात्मक बाबींशी निगडीत असतील किंवा त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्याबाबत शासनाच्या आदेशाची आवश्यकता असेल तर असे प्रकरण मा. न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या दिनांकापासून ०७ दिवसात शासनाचे सचिव यांचे अथवा संचालकांचे निदर्शनास आणून द्यावे. न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी जर संबंधित सहाय्यक आयुक्त / प्रादेशिक उपायुक्त यांचे अधिकाराचीच बाब असेल तर त्यांनी तात्काळ मा.न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी. ज्या प्रकरणात शासनाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असेल तर त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करुन प्रकरण वेळेवर निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावे. मा. न्यायालयाचे कामकाजात दिरंगाई करणारे अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी.

III) कुठल्याही परिस्थितीत मा. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही यासाठी योग्य ती कार्यवाही कोणताही विलंब न लावता प्राधान्याने करावी.

IV) काही न्यायालयीन प्रकरणे धोरणात्मक बाब किंवा वित्तीय भाराशी निगडीत असेल आणि निर्णय घेण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असेल तर अशी बाब मा. न्यायालयाच्या वेळीच निदर्शनास आणून दयावी आणि तात्काळ वेळ / मुदतवाढ मागावी. आवश्यकता भासल्यास तसे प्रतिज्ञापत्र मा. न्यायालयात दाखल करावे.

V) यानंतर सुध्दा एखाद्या न्यायालयीन प्रकरणात अवमान याचिका दाखल झाली तर लगेच संबंधित प्रकरणाबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल मा. न्यायालयाचे निदर्शनास आणून दयावा आणि त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र प्राधान्याने शासनाच्या मान्यतेने विहित मुदतीत मा.न्यायालयात दाखल करावे.

२) काही न्यायालयीन प्रकरणी शासनाचे असे निदर्शनास आले आहे की, काही संस्था अथवा शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी या विभागाच्या शासन निर्णय दि. ०३/१०/२०१७ व दि. १५/०३/२०१८ प्रमाणे पर्यायी न्याय व्यवस्था उपलब्ध असताना सुध्दा थेट मा. न्यायालयात याचिका दाखल करतात ही बाब संयुक्तिक नाही. शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या पर्यायी न्याय व्यवस्थेचा संबंधित संस्था अथवा शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी लाभ घेत नसतील व थेट मा. न्यायालयात दाद मागत असतील तर अशी संस्था किंवा असे शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना पर्यायी न्याय व्यवस्थेचा प्रथम उपयोग करण्याबाबत समज देण्यात यावी. तसेच सदर बाब सर्व न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावी.

३) मा.न्यायालयाची सर्व प्रकरणे योग्यरित्या हाताळण्यासाठी प्रत्येक जिल्हा/ प्रादेशिक उपायुक्त / संचालक कार्यालयामध्ये न्यायिक कक्षाची (Legal cell) स्थापना करावी आणि एका गट- ब (वर्ग -२) संवर्गातील अधिकाऱ्याची त्या कक्षात नियुक्ती करावी आणि त्यांनी मा. न्यायालयाचे कार्यालयाच्या संबंधित सरकारी वकील यांच्या सतत संपर्कात राहून प्रत्येक न्यायालयीन प्रकरणात वेळीच योग्य कार्यवाही झाली किंवा नाही हे पहावे. मा. न्यायालयामध्ये दाखल प्रत्येक प्रकरण दाखल झाल्यानंतर ०१ महिन्याच्या आत शपथपत्र दाखल करण्यात यावे. काही अपरीहार्य कारणास्तव जास्तीत जास्त ०२ महिन्यांत शपथपत्र दाखल करावे. सदर मुदतीत शपथपत्र दाखल न केल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी. तसेच काही प्रकरणांत जर दिरंगाई होत असेल तर सदर बाब तात्काळ वरीष्ठ अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच परिशिष्ठ अ-१ ते अ-४ प्रमाणे न्यायालयीन प्रकरणांबाबत दर महिन्यास विवरणपत्रामध्ये संचालक विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय पुणे व शासनास सादर करावे. कोणत्याही न्यायालयीन प्रकरणात शक्यतो अवमान याचिका दाखल होणार नाही याची वेळोवळी खबरदारी घ्यावी. तसेच वाचा येथील या विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे जर संस्थाचालक / शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी कार्यवाही करत नसतील तर अशी सर्व प्रकरणे वेळीच या विभागाच्या निदर्शनास आणून द्यावीत व संदर्भीय शासन निर्णयामध्ये नमूद तरतुदींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०४१८१५५२३९९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.04.18 15:54:03 +05'30'

**( भा. र. गावित )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
५) सचिव,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई
६) संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
७) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव,मंत्रालय, मुंबई
१०) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
११) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) महालेखाकार (वित्त व लेखा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१४) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१५) सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१६) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) सर्व संस्थाप्रमुख, मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्चमाध्यमिक आश्रमशाळा यांच्यामार्फत...
१७) मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्चमाध्यमिक आश्रमशाळा ------------
१८) निवड नस्ती (विजाभज-२)

**प्रपत्र अ-१**

**जिल्हाचे नाव:-**

**विभागाचे नाव:-**

**मा. न्यायालयामध्ये प्रलंबित आणि शपथपत्र दाखल केलेली न्यायालयीन प्रकरणे**

| अ.क्र | मा. न्यायालयामध्ये दाखल याचिकेचा क्रमांक व याचिककर्ता यांचे नाव तसेच याचिका दाखल झाल्याचा दिनांक | परीच्छेदनिहाय अभिप्राय दाखल केल्याचा दिनांक | शपथपत्र दाखल केल्याचा दिनांक | याचिकेचा विषय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## प्रपत्र अ-२

**जिल्हाचे नाव:-**
**विभागाचे नाव:-**

### मा. न्यायालयामध्ये प्रलंबित परंतु अद्याप शपथपत्र दाखल केलेले नाही अशी न्यायालयीन प्रकरणे

| अ.क्र | मा. न्यायालयामध्ये दाखल याचिकेचा क्रमांक व याचिककर्ता यांचे नाव तसेच याचिका दाखल झाल्याचा दिनांक | याचिकेचा विषय | मा.न्यायालयामध्ये अद्याप शपथपत्र दाखल न करण्याचे कारण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**प्रपत्र अ-३**

**जिल्हाचे नाव:-**

**विभागाचे नाव:-**

**मा. न्यायालयाने याचिकाकर्ता यांच्या बाजूने दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती**

| अ.क्र | मा. न्यायालयामध्ये दाखल याचिकेचा क्रमांक व याचिककर्ता यांचे नाव तसेच याचिका दाखल झाल्याचा दिनांक | याचिकेचा विषय | मा.न्यायालयाने याचिकाकर्ता यांच्या बाजूने निकाल दिल्याचा दिनांक तसेच मा. न्यायालयाचे आदेशाची प्रत मिळाल्याचा दिनांक | मा.न्यायालयाने दिलेली कालमर्यादा | मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**प्रपत्र अ-४**

**जिल्हाचे नाव:-**

**विभागाचे नाव:-**

**मा. न्यायालयामध्ये दाखल अवमान याचिकांची सद्यस्थिती**

| अ.क्र | मा. न्यायालयामध्ये दाखल अवमान याचिकेचा क्रमांक व याचिककर्ता यांचे नाव तसेच याचिका दाखल झाल्याचा दिनांक | अवमान याचिका कोणत्या रिट याचिकेमध्ये दाखल झाली आहे व त्या याचिकेच्या निकालाचा दिनांक | मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही न होण्याची करणे | अवमान याचिकेची सद्यस्थिती | अवमान याचिकेमध्ये मा. न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल केले आहे किंवा कसे. शपथपत्र दाखल केले असल्यास त्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |